सकाळ

20 JAN 2023



जळगाव : सागर पार्कवर गुरुवारी दीपप्रज्वलन करून बहिणाबाई महोत्सवाचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी अमन मित्तल व मान्यवर.

# बहिणाबाई महोत्सवाचे थाटात उद्घाटन

## पाचदिवसीय पर्वणी; सांस्कृतिक मेजवानी

▶ सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता.१९ : भरारी फाउंडेशन आयोजित बहिणाबाई महोत्सवास गुरुवारी (ता. १९) थाटात प्रारंभ झाला. बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जिल्हाधिकारी अमन मित्तल यांनी महोत्सवाचे उद्घाटन केले. आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षाचा प्रारंभ कृषी विभागातर्फे या महोत्सवात तृणधान्ये पूजन करून करण्यात आला. महोत्सवात खानदेशातील विविध लोककला, शाहिरी पोवाडा, भारुड, वहीगायन आदी लोककलांबरोबरच शालेय व महाविद्यालयीन कलावंत पाच दिवस आपली कला सादर करणार आहेत.

कार्यक्रमाच्या सुरवातीला खेळ चारचौघींचा, रांगोळी व तसेच मेहंदी स्पर्धा झाली. जिल्हाधिकारी अमन मित्तल, विकास पाटील, कृषी संचालक, डॉ. पी. आर. चौधरी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विभागीय कृषी सहसंचालक मोहन वाघ, कृषी उपसंचालक अनिल भोकरे, उद्योजक रजनीकांत कोठारी, अलीम थमस्ती, कुशल गांधी, बाळासाहेब सूर्यवंशी, किशोर ढाके, सपन झुनझुनवाला, डॉ. पी. आर. चौधरी, राजेश चौधरी, पंकज जैन, रमेश मुणोत, अर्चना जाधव, शैला चौधरी या वेळी उपस्थित होत्या. दीपक परदेशी यांनी प्रास्ताविक केले. विनोद ढगे यांनी सूत्रसंचालन केले.

### यांचा झाला गौरव

■ विकास पाटील कृषी संचालक (पुणे), तात्यासाहेब फडतरे (पुणे), श्रीराम पाटील (जळगाव), सुकन्या पाटील-कुलकर्णी, राजेश ठोंबरे (चाळीसगाव), राहुल पाटील (चोपडा) यांच्यासह अजिंक्य क्रांती फाउंडेशन, जळगाव फ्लॉगर्स, पशूपापा फाउंडेशन आदींचा या वेळी सत्कार करण्यात आला.